MHAH220007682020

रे.मु.नं. ११८/२०२०
संजय केरु टकले वि. कैलास बाबा
टकले व इतर

आदेश
(नि.क्र.५८ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा प्रतिवादी यांनी  दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये आणि स.नं. ४३/२अ या जमिनीचे वादी यांचे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा प्रतिवादी क्र. १ ते ९ विरुध्द मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र. ६ ही दि. ०१/०२/२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ८ दि. १३/०३/२०२३ रोजी  मयत झालेले असुन प्रतिवादी क्र. ६ लक्ष्मीबाई ही दुसऱ्या गावात राहत असल्यामुळे प्रतिवादी क्र. ६ ही मयत झालेबाबत माहिती झाली नाही. तसेच प्रतिवादी क्र. ८ चा मयताचा दाखला वेळेत मिळु शकला नाही. वादीविरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द करण्यात यावा अशी वादीतर्फे विनंती करण्यात आली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जातील कारण कायदेशीर नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी प्रतिवादीतर्फे विनंती करण्यात आली आहे.

४. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. ६ व ८ यांचे वारसदार अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. ६ व ८ यांचा मृत्यु झाल्याबाबत व त्यांच्या वारसांबाबत नाकारलेले नाहीत. वादीला प्रतिवादी क्र. ६ व ८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफीचा अर्ज मंजुर करण्यात आलेला आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीचा नि.क्र. ५८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. वादी विरुध्द झालेला दावा अबटेचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.11 18:21:08 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :११/०३/२०२६.